# पतसंस्थांची संख्या व डिपॉझिट गॅरंटी कार्पोरेशन

महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त डॉ. कृष्णा लव्हेकर यांनी १५ सप्टेंबर, २००८ रोजी एक परिपत्रक काढून महाराष्ट्र राज्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या दर्शविणारी आकडेवारी प्रसिध्द केली आहे. त्या संदर्भात राज्यातील पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्याची माहिती व्हावी या उद्देशाने जशीच्या तशी आकडेवारी प्रसिध्द करण्याचे काम करीत आहोत.

३१ मार्च २००८ अखेर अस्तीत्वात असणाऱ्या सहकारी संस्थांची एकूण संख्या २०५७५३ अशी आहे. गतवर्षीच्या तुलनेत या संख्येत २.५ टक्के वाढ झाली आहे. दिनांक ३१/०३/२००८ अखेर महाराष्ट्र राज्यातील एकूण सहकारी संस्थांची संख्या खालील प्रमाणे:

| अ.क्र | जिल्ह्याचे / विभागाचे नाव | एकूण |
|---|---|---|
| 1 | मुंबई | 28188 |
| 2 | ठाणे | 24245 |
| 3 | रायगड | 3622 |
| 4 | सिंधुदूर्ग | 1118 |
| 5 | रत्नागिरी | 2216 |
| 6 | नाशिक | 11290 |
| 7 | धुळे | 3271 |
| 8 | नंदुरबार | 1878 |
| 9 | जळगाव | 5603 |
| 10 | अहमदनगर | 9471 |
| 11 | पुणे | 22116 |
| 12 | सोलापुर | 10522 |
| 13 | सातारा | 6188 |
| 14 | सांगली | 5880 |
| 15 | कोल्हापुर | 12463 |
| 16 | औरंगाबाद | 6310 |
| 17 | जालना | 2782 |
| 18 | परभणी | 2199 |
| 19 | हिंगोली | 993 |
| 20 | बीड | 5517 |
| 21 | नांदेड | 3846 |
| 22 | उस्मानाबाद | 4113 |
| 23 | लातुर | 3699 |
| 24 | बुलढाणा | 2579 |
| 25 | अकोला | 1761 |
| 26 | वाशिम | 1300 |

| | | |
|---|---|---|
| 27 | अमरावती | 3181 |
| 28 | यवतमाळ | 2896 |
| 29 | वर्धा | 1841 |
| 30 | नागपुर | 4892 |
| 31 | भंडारा | 1701 |
| 32 | गोंदिया | 1681 |
| 33 | चंद्रपुर | 2112 |
| 34 | गडचिरोली | 879 |
| | गृहनिर्माण संस्था, सिडको | 3400 |
| | महाराष्ट्र राज्य | **205753** |

पैकी सहकारी संस्थांच्या प्रकारानुसार राज्यातील ग्रामीण व बीगरशेती सहकारी पतसंस्थांची आकडेवारी खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | जिल्ह्याचे / विभागाचे नाव | नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था | इतर नागरी पतपुरवठा संस्था | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामिण | नागरी | |
| 1 | मुंबई | 819 | 0 | 1899 | 2718 |
| 2 | ठाणे | 305 | 134 | 911 | 1350 |
| 3 | रायगड | 173 | 207 | 131 | 511 |
| 4 | सिंधुदूर्ग | 47 | 113 | 31 | 191 |
| 5 | रत्नागिरी | 81 | 204 | 62 | 347 |
| 6 | नाशिक | 410 | 332 | 340 | 1082 |
| 7 | धुळे | 144 | 172 | 205 | 521 |
| 8 | नंदुरबार | 59 | 60 | 121 | 240 |
| 9 | जळगाव | 183 | 348 | 555 | 1086 |
| 10 | अहमदनगर | 215 | 643 | 298 | 1156 |
| 11 | पुणे | 691 | 1120 | 904 | 2715 |
| 12 | सोलापुर | 326 | 693 | 394 | 1413 |
| 13 | सातारा | 222 | 731 | 254 | 1207 |
| 14 | सांगली | 191 | 885 | 418 | 1494 |
| 15 | कोल्हापुर | 338 | 1396 | 427 | 2161 |
| 16 | औरंगाबाद | 340 | 121 | 293 | 754 |
| 17 | जालना | 64 | 38 | 89 | 191 |
| 18 | परभणी | 83 | 18 | 82 | 183 |
| 19 | हिंगोली | 40 | 8 | 14 | 62 |
| 20 | बीड | 194 | 216 | 129 | 539 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | नांदेड | 200 | 0 | 55 | 255 |
| 22 | उस्मानाबाद | 152 | 151 | 121 | 424 |
| 23 | लातुर | 248 | 56 | 39 | 343 |
| 24 | बुलढाणा | 198 | 95 | 129 | 422 |
| 25 | अकोला | 177 | 27 | 57 | 261 |
| 26 | वाशिम | 66 | 18 | 35 | 119 |
| 27 | अमरावती | 234 | 56 | 102 | 392 |
| 28 | यवतमाळ | 147 | 35 | 73 | 255 |
| 29 | वर्धा | 98 | 70 | 96 | 264 |
| 30 | नागपुर | 375 | 286 | 314 | 975 |
| 31 | भंडारा | 109 | 106 | 52 | 267 |
| 32 | गोंदिया | 55 | 70 | 27 | 152 |
| 33 | चंद्रपुर | 177 | 50 | 116 | 343 |
| 34 | गडचिरोली | 61 | 23 | 23 | 107 |
| | महाराष्ट्र राज्य | 7222 | 8482 | 8796 | 24500 |

वरील आकडेवारीवरून आपल्या लक्षात येईल की, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ग्रामीण बिगरशेती व नागरी सहकारी **पतसंस्थांची संख्या १८२७८ आहे**. म्हणजेच ह्यापूर्वी विविध ठिकाणी ह्या आकडेवारी विषयी वेगवेगळी वक्तव्ये केली जात होती. आणि त्यामुळे वर्तमानपत्रामध्ये सुध्दा चुकीच्या आकडेवारीचा आधार घेवून प्रत्यक्ष कागदोपत्री माहिती न घेता आकडेवारी प्रसिध्द केली जात होती. परंतू राज्यातील पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांना ह्याविषयी अधिकृत माहिती असावी यासाठी आम्ही प्रसिध्द केलेली ही आकडेवारी आपल्या प्रत्येकाच्या ज्ञानात भर टाकील यात शंका नाही.

राज्यामध्ये नोकरदारांच्या पतसंस्था याविषयीसुध्दा जे बेसुमार व अर्थहीन बोलले व छापले जात होते. याला काहीही आधार नव्हता.

ग्रामीण बिगरशेती व नागरी सहकारी पतसंस्था यांची संख्या बघता महाराष्ट्र शासनास दखल घ्यावीच लागणार अशा प्रकारची परिस्थिती आहे. आणि ही संख्या अस्तित्वात असणाऱ्या पतसंस्थांची आहे. म्हणजेच या विषयी शासन पतसंस्थांविषयी विरोधाभास दर्शविणारे बोलू शकत नाही. व त्या अनुषंगाने सरकार अनिश्चित व बेकायदेशीर कारवाई पतसंस्थांवर करू शकत नाही.

प्रसिध्द झालेली आकडेवारी ही अस्तित्वात असणाऱ्या पतसंस्थांची म्हणजेच ज्या पतसंस्था चालू आहेत, म्हणजेच ज्या पतसंस्था आपले कामकाज संस्थेचा उपविधी व सहकार कायद्या अंतर्गत प्रत्यक्ष काम करीत आहेत. त्यांचे अस्तित्व सरकारने दाखविले आहे. विशेष म्हणजे गेल्या ८ ते १० वर्षात पतसंस्थांच्या या आकडेवारीत फारसा बदल झालेला नाही. म्हणजेच राज्यातील पतसंस्थांचे काम नियमाप्रमाणे चालू आहे. आणि अशांचेच अस्तित्व मा. सहकार आयुक्तांच्या माध्यमातून सरकारला अबाधित ठेवावे लागले. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने व त्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पतसंस्थांविषयी जो जो डांगोरा काही दिवसापूर्वी सतत पिटला होता, त्याचा पडदा त्यांच्याच मुखियाने म्हणजेच मा. सहकार आयुक्तांनी वरिलप्रमाणे केल्यामुळे सर्वांचे

पितळ उघडे पडले आहे. स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलणेविषयी व जनतेसाठी काम करण्याची भुमिका ज्यांना मान्य नाही, असे लोक लोकशाहीमध्ये जनतेचे पुढारी बनतात. आणि अशा दिशाभुल करणाऱ्या लोकांमुळे पतसंस्थांविषयी कारण नसताना बोलले जात होत.

राज्यात सहकारी साखर कारखान्यांना केंद्र व राज्य सरकार विविध करामती करून, ज्यांनी खऱ्या अर्थाने राज्यातील ७० टक्के शेतकऱ्यांना आर्थिकदृष्या नाडलेले आहे, त्यांनाच आर्थिक मदतीचा ओघ सातत्याने चालु आहे. केवळ सहकारी साखर कारखान्यास आर्थिक मदत, आर्थिक सवलती, पॅकेजेस शासन देते हे जनतेच्या लक्षात येवू नये म्हणून, इतर थातूर - माथूर गोष्टी राज्यात बोलल्या जातात व त्यापैकी काही किरकोळ स्वरूपात केल्या जातात. राज्यातील सर्व प्रकारच्या बँकांना ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी डिपॉझिट गॅरंटी कारपोरेशन केंद्र सरकारने उपलब्ध करून दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यातील काही विशिष्ठ सेक्टरला आर्थिक मदतीचा हातभार लावीत असल्याचा देखावा करण्यासाठी काही कारर्पोरेशनची निर्मिती राज्य सरकारने केली आहे. आणि अशा परिस्थितीत पतसंस्थांसाठी राज्य सरकारने स्वतः '' **पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी**'' का जबाबदारी स्विकारू नये? असा प्रश्न गेली कित्येक वर्ष राज्यातील पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांमध्ये दबा धरून बसलेला आहे.

पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना राज्य सरकारने दुय्यम वागणुक देणे हे पाप असून त्यांची किंमत संबंधितांना मोजावीच लागणार यात शंका नाही. जनतेच्या पैशाची सुरक्षितता भक्कमपणे असावी व त्यासाठी लागणारी आवश्यक यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी घटनेने राज्य सरकारला दिलेली आहे. आणि ती जबाबदारी सरकार पूर्ण करीत नाही. किंबहुना **डिपॉझिट गॅरंटी** ही संकल्पना पतसंस्थांना वरदान ठरेल व राज्यातील करोडो ठेवीदार व सभासद पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे नेतृत्व स्विकारतील या भयगडाने राज्य सरकार पतसंस्थांसाठी काम करीत नाही, असे अलीकडच्या काळात उघड होत चाललेले आहे.

परंतु दुसऱ्यासाठी खड्डा खोदणारे लोक स्वतः खड्ड्यात पडतात याची जाणीव संबंधितांना अद्यापही होत नाही आणि त्यामुळेच प्रत्येक जण आपापली ह्यापुर्वी केलेली विघातक प्रवृत्तीची कामे व त्यातुन मिळविलेला मलिदा लपविण्यासाठी केविलवाणी धडपड करीत आहेत. काही वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्याचे **तत्कालीन सहकार आयुक्त मा. रत्नाकर गायकवाड व उमेशचंद्र सरंगी यांनी सहकार कायदा हातात घेऊन** सहकारी तत्वावर पतसंस्थांच्या ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी **डी. जी. सी. नावाचे कारर्पोरेशन अस्तित्वात आणले.** केंद्र व राज्य सरकारला फाट्यावर मारून अत्यंत उद्दामपणे महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेली सहकारी संस्थेची निर्मिती केली आणि त्यास बँकांसारखे '' **डिपॉझिट गॅरंटी कारर्पोरेशन** '' असे स्वरूप भासविले. शेवटी या तथाकथित पतसंस्थांच्या गॅरंटी कारर्पोरेशनचा अंत झाला. ज्यांनी सरकारचे प्रतिनिधी म्हणून यात भाग घेतला त्या दोन्ही उपरोक्त माजी सहकार आयुक्तांनी अत्यंत सहजपणे आता त्यातुन आपले अंग काढून घेतले आहे. पण त्याचे दुष्परिणाम व आर्थिक चटके मात्र राज्यातील शेकडो पतसंस्थांना बसले. त्या पतसंस्थांना प्रत्येकी लाखो रूपये व्याजामध्ये व करोडो रूपये मुद्दलामध्ये खोट खावी लागली. हे प्रकरण अद्यापही गुलदस्त्यात आहे. कारण सर्व स्तरावर '' **तेरी भी चुप, मेरी भी चुप** '' या उक्तीप्रमाणे स्मशान शांतता आहे. पतसंस्थांना आर्थिक चटका ज्यांच्या पुढाकारामुळे बसला ते राज्याचे दोन्ही सहकार आयुक्त **आय. ए. एस.** अधिकारी असल्यामुळे व सरकारी सेवेत असल्यामुळे एवढे गंभीर प्रकरण सी. बी. आय. कडे एवढ्यात जायला हवे होते. परंतु ह्या प्रकाराबद्दल **कुठल्याही पोलिस ठाण्यात साधी एन. सी. सुध्दा नोंदविली गेली नाही,** त्यामुळे पोलिस केसही अद्याप कोणावरही झालेली नाही.

ज्या पतसंस्थांचे करोडो रूपये ह्या बेकायदेशीर अस्तित्वात आणलेल्या डिपॉझिट गॅरंटी कारर्पोरेशनमुळे बुडाले, त्यांच्यावर सि. बी. आय. जोपर्यंत कारवाई करत नाही तोपर्यंत पतसंस्थांना आर्थिक न्याय मिळणार नाही. आणि राज्य सरकारने ह्या प्रकरणी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. आणि ज्यांचे लाखो / करोडो रूपये ह्या

गॅरंटी कारर्पोरेशनमुळे बुडाले आहेत त्याची भरपाई उपरोक्त दोन्ही माजी सहकार आयुक्तांच्या माध्यमातून किंबहुना राज्य सरकारने ह्या रकमा संबंधितांना त्वरीत अदा केल्या पाहिजेत. आणि त्याचबरोबर राज्यातील १८२८७ नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी  पतसंस्थांसाठी महाराष्ट्र राज्य सरकारने स्वतः पुढाकार घेऊन विना विलंब **डिपॉझिट गॅरंटी कारर्पोरेशन** अस्तित्वात आणले पाहिजे.किंबहुना ही राज्य सरकारची जबाबदारी आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!